छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे
विभागीय कार्यालय नाशिक .
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
पत्ता- बॅरेक नंबर - 8, विभागीय आयुक्त कार्यालय आवार ,नाशिकरोड,नाशिक- ४२२१०१

सत्यमेव जयते

सारथी
"शाहू - विचारांना देवूया गती साधुया सर्वांगीण प्रगती"

ई-मेल-sarthinashik@gmail.com | दुरध्वनी क्र. :०२५३-२९९३६८९

जा.क्र.सारथी/पत्रव्य / 115 / २०२३ | दिनांक : ०३-०३-२०२३

**प्रति,**
मा.व्यवस्थापकीय संचालक,
छत्रपती शाहू महाराज संशोधन,
प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी),पुणे

**विषय :-** नाशिक येथील मातोश्री मुलींचे वसतिगृह सुरु करणेकामी प्रसिध्दीपत्रक प्रसिध्दी करणेबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वे सविनय सादर करण्यात येते की, जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री मुलींचे वसतिगृह सुरु करावयाचे आहे. त्याअनुषंगाने मुलींचे प्रवेश प्रक्रीये संदर्भातील आवश्यक लिंक सारथी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच समवेत जोडलेले प्रसिध्दीपत्रक सारथी संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात यावे ही विनंती.

सोबत :- मातोश्री वसतिगृह प्रवेश प्रसिध्दीपत्रक.

**(गणेश मिसाळ)**
**प्रभारी उपव्यवस्थापकीय संचालक,**
**सारथी, नाशिक**

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर
१. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा.व्यवस्थापकीय संचालक,महात्मा ज्योतिबा फुले,संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),नागपुर.

**जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने**

शासन निर्णय क्रमांक :वसति ५३१७ /प्र .क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर,२०२२ **अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह,सरस्वती नगर, धात्रक फाटा,पंचवटी,नाशिक, येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे** यामार्फत **मराठा, कुणबी, मराठा- कुणबी व कुणबी -मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी** व **महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी** तसेच **उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकुण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात येत आहे.** सदरील वसतिगृहामध्ये म.न.पा. नाशिक हद्दीतील **व नाशिक तालुक्यातील** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनीना प्रवेशास प्राधान्य असेल. तसेच सारथी व महाज्योती यांच्या विद्यार्थिनीना मासिक भोजन भत्ता व इतर निर्वाह भत्ते रु.५३००/- इतके देय राहील. उच्च व तंत्र शिक्षण या विभागाच्या विद्यार्थिनींना त्या विभागाचे शासन निर्णयान्वये भत्ते देय राहतील.

**मातोश्री शासकीय २०० मुलींचे वसतिगृहामध्ये अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे राहिल.**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | सारथी मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ७५ | महाज्योती मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ७५(*) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ५० |
|---|---|---|---|---|
| १ | व्यावसायिक पदवी | ५२ | ५२ | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्राप्त निर्देशानुसार ही ५० विद्यार्थीनींची अभ्यासक्रनिहाय विगतवारी यादी निश्चित करण्यात येईल. |
| २ | बिगर व्यावसायिक पदवी | १२ | १२ | |
| ३ | पदव्युत्तर पदवी | ११ | ११ | |
| एकुण | | ७५ | ७५ | ५० |

**(*)महाज्योतीचे प्रवर्गनिहाय वसतिगृह प्रवेश संख्या - ओबीसी - ४४, व्हिजेएनटी - २६, एसबीसी - ५.**

**सारथी, महाज्योती संस्था व उच्च व तंत्र शिक्षण यांचे प्रवेशासाठीचे आवश्यक निकष, अटी व शर्ती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**सारथी विभागीय कार्यालय**

**पत्ता**-बॅरेक नंबर- ८ ,विभागीय आयुक्त कार्यालय आवार नाशिकरोड, नाशिक. पिन कोड -.४२२१०१.

**संपर्क :** फोन नं- **०२५३-२९९३६८९** ई-मेल -sarthinashik@gmail.com संकेतस्थळ https://sarthi- maharashtragov.in/

**महाज्योती विभागीय कार्यालय**

**संपर्क :** फोन नं- **८०८७५७६३९३** ई-मेल -mahajyotinsk@gmail.com संकेतस्थळ https://mahajyoti.org.in/

**सारथी व महाज्योतीचे संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरण्याचा दिनांक ०८-०३-२०२३ ते १७-०३-२०२३ असून अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित करून पोस्टाद्वारे/ प्रत्यक्ष सारथी संस्थेचे नाशिक येथील वरील पत्यावर दिनांक २०-०३-२०२३ पावेतो सादर करावेत.**

टीप :१.वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

२.वसतिगृहात प्रवेश देण्यात येणाऱ्या पात्र मुलींची यादी सबंधित सारथी / महाज्योती / उच्च व तंत्र शिक्षणविभाग यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन अंतिम केल्यानंतर सारथीचे संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रत्यक्ष दाखल (हजर) होण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(गणेश मिसाळ)
प्रभारी उपव्यवस्थापकीय संचालक,
सारथी, नाशिक

ठिकाण — नाशिक
दिनांक- ०३/०३/२०२३